सोलापूर महानगरपालिका

जाक्र/सआस/कक्ष-१/आस्था-२/१७५६
सामान्य प्रशासन विभाग,
दि.२०-१२-२०१७

जाहिरात

**Walk - In - Interview**

**दि.२६/१२/२०१७ वेळ - दुपारी ०२:०० वाजतां.**

**अर्ज स्विकारण्याची वेळ - सकाळी १०:०० ते ०१:००**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका,इंद्रभवन, सोलापूर**

सोलापूर महानगरपालिका, आरोग्याधिकारी कार्यालय अंतर्गत मदर तेरेसा पॉलिक्लिनिक (डफरीन हॉस्पिटल) करीता वैद्यकीय अधिकारी या पदनामाचे खालील शैक्षणिक पात्रतेमध्ये दरमहा एकवट मानधनावर **Walk - In - Interview** द्वारे कंत्राटीपध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता भरण्यांत येत आहेत.उपरोक्त पदांवर कंत्राटी तत्वावर कार्य करण्यास इच्छुक व पात्र असणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या | एकवट मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | बी.ए.एम.एस पात्रता धारक, ३ वर्षे काम केलेला अनुभव आवश्यक | ०४ | रु.१५०००/- पुर्ण वेळ |

इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांचे संपुर्ण परिचयपत्र (Bio-data)सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती,पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती सांक्षाकिंत करुन वरील तारखेस वेळेवर उपस्थित रहावे.

१) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.
२) उमेदवारांचे अर्ज दि.२६/१२/२०१७ रोजी सकाळी १०:०० ते १:०० वाजेपर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३) कमाल वयोमर्यादा सर्वसाधारण वर्गासाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे व अंपगासाठी ४५ वर्षे.
४) मुलाखत कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे,अंशत: बदल करणे तसेच इतर शर्ती व अटीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार आयुक्त यांना राहतील.
५) सदरचे पद निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात करार तत्वावर एकवट मानधनावर भरण्यात येत असल्याने यासंबंधीचे सेवाविषयक सर्व अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.
६) सदरचे पद हे कंत्राटी पध्दतीने करारतत्वार भरण्यात येत असल्याने पदावर नियुक्त कर्मचा-यास शासकीय कर्मचा-याला देण्यात येणारे कुठलेही फायदे अनुज्ञेय नसतील.
७) या सेवा करार पध्दतीच्या असल्याने उमेदवारास कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.
८) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीमध्ये अशा कर्मचा-यांच्या करारपध्दतीतील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
९) सदरची नियुक्तीही सहा महिन्याकरिता व कंत्राटीपध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात एकवट मानधनावर असल्याने नियुक्तीपूर्वी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन दयावे लागेल.
१०) सदरची जाहिरात सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in यासंकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर